**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांकः25.10.2024** **वारःशुक्रवार**

---

**ठळक बातम्या**

- पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जर्मनीचे चान्सलर ओलाफ शॉल्ज यांच्यात आज नवी दिल्लीत आंतर-सरकारी पातळीवरील बैठक
- न्यायमूर्ती संजीव खन्ना होणार देशाचे नवे सरन्यायाधीश
- महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी; अनेक दिग्गज उमेदवारांचे अर्ज दाखल
- दाना चक्रीवादळ ओडिशाच्या किनाऱ्यावर धडकलं; अनेक जिल्ह्यात मुसळधार पाऊस
  आणि
- महिला क्रिकेटमध्ये मर्यादित षटकांच्या सामन्यात न्यूझीलंडवर मात करत भारतीय संघाची विजयी सलामी

**भारत-जर्मनी**

भारत आणि जर्मनी यांच्यादरम्यान आज सातवी आंतरसरकारीपातळीवरील बैठक होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जर्मनीचे चॅन्सेलर ओलाफ शोल्झ या बैठकीचं संयुक्त अध्यक्षपद भूषवतील. चॅन्सेलर शोल्झ यांचं काल तीन दिवसांच्या भारत भेटीवर आगमन झालं. या बैठकीदरम्यान उभय नेत्यांमध्ये सुरक्षा आणि संरक्षण सहकार्य, वाढीव आर्थिक सहकार्य, हरित आणि शाश्वत विकास भागीदारी तसंच उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रात सहकार्य या मुद्यांवर चर्चा अपेक्षित आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जर्मनीचे चॅन्सेलर ओलाफ शोल्झ 18 व्यय आशियाई पॅसिफिक परिषदेलाही संबोधित करणार आहेत.

**राष्ट्रपती-छत्तीसगढ**

राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू आजपासून दोन दिवसांच्या छत्तीसगढच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात, त्या रायपूर इथल्या एम्स, राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, आय आय टी भिलाई तसंच रायपूरमधील पंडित दीनदयाळ उपाध्याय आयुष विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहणार आहेत. नया रायपूर इथल्या पुरखौती मुक्तांगणलाही त्या भेट देतील.

**रेल्वे प्रकल्प**

केंद्रीय मंत्रीमंडळाच्या आर्थिक व्यवहारविषयक समितीच्या काल झालेल्या बैठकीत 6 हजार 798 कोटी रुपये किमतीच्या दोन रेल्वे प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. पहिल्या प्रकल्पांतर्गत नरकटियागंज-रक्सौल, सीतामढी, दरभंगा आणि सीतामढी-मुझफ्फरपूर असा 256 किमी लांबीचा दुहेरी रेल्वे मार्ग प्रस्तावित असून, बिहारमधील रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणासाठी 4 हजार 53 कोटी रुपये खर्चाला मंजुरी देण्यात आली आहे. आंध्र प्रदेशची नवी राजधानी अमरावतीसाठीही नवीन रेल्वेलाईन बांधण्यात येणार असून, एरुपलेम ते नंबुरू मार्गे

अमरावती दरम्यान 57 किलोमीटरचा नवीन रेल्वे मार्ग टाकला जाईल अशी माहिती माहिती आणि प्रसारण मंत्री अशिनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत, पत्रकार परिषदेत दिली.

**कॅबिनेट निर्णय**

अंतराळ क्षेत्रासाठी एक हजार कोटी रुपयांचा व्हेंचर कॅपिटल निधी स्थापन करण्याला काल केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. या प्रस्तावित व्हेंचर कॅपिटल निधीचं कार्य प्रत्यक्ष सुरू झाल्याच्या तारखेपासून पाच वर्षांसाठी तो लागू करण्याची सरकारची योजना आहे.

**राजनाथ सिंह**

भारत आणि चीनमध्ये राजनैतिक आणि लष्करी पातळीवरच्या वाटाघाटी सुरु असून प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळच्या काही भागाबद्दल असलेले मतभेद मिटवण्यात त्याची मदत होत असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत काल आयोजित करण्यात आलेल्या ‘चाणक्य संवाद 2024’ या कार्यक्रमात ते बोलत होते.

**नवे सरन्यायाधीश**

देशाचे नवे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती संजीव खन्ना यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यमान सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांचा कार्यकाळ, येत्या 10 नोव्हेंबरला पूर्ण होत असून, न्यायमूर्ती खन्ना 11 नोव्हेंबरपासून सरन्यायाधिशपदाची सूत्रं स्वीकारतील. राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी विद्यमान सरन्यायाधीश, न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड यांच्याशी चर्चा करून हा निर्णय घेतल्याचं केंद्रीय कायदे मंत्री अर्जुनराम मेघवाल यांनी समाजमध्यमांवरील संदेशांत सांगितलं आहे.

**मुलाखत**

गेल्या 75 वर्षांत सर्वोच्च न्यायालयाचं रूप बदलून ते जनतेचं न्यायालय झालं आहे, असं प्रतिपादन विद्यमान सरन्यायाधीश न्यायमूर्ती डी.वाय. चंद्रचूड यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या 75 व्या वर्धापन दिनानिमित्त आकाशवाणीला दिलेल्या विशेष मुलाखतीत केलं आहे. देशाचं सर्वोच्च न्यायालय लोकन्यायालय म्हणून काम करतं असं उदाहरण जगात विरळाच आहे असं ते म्हणाले. ही विशेष मुलाखत आज रात्री साडे नऊ वाजता प्रसारित करण्यात येणार आहे.

**उमेदवारी अर्ज**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची धामधूम जोरात सुरू झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं 45 उमेदवारांची तर काँग्रेसनं 48 उमेदवारांची पहिली यादी काल जाहीर केली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने आपल्या पहिल्या यादीत कर्जत जामखेड मतदारसंघासाठी रोहित पवार, बारामतीसाठी युगेंद्र पवार, पारनेरमध्ये राणी लंके आणि तासगाव-कवठे महांकाळ मतदारसंघात रोहित पाटील यांना उमेदवारी दिली आहे. काँग्रेसकडून माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना कऱ्हाड दक्षिणमधून, नाना पटोले यांना साकोलीमधून, तर विजय वडेट्टीवार यांना ब्रह्मपुरीमधून उमेदवारी देण्यात आली आहे. पुण्यातल्या कसबा विधानसभा मतदार संघातून रवींद्र धंगेकर यांना उमेदवारी जाहीर झाली आहे.

महायुती आणि महाविकास आघाडीतील घटक पक्षांच्या बहुतांश उमेदवारांनी काल गुरुपुष्यामृताचा योग साधत आपापले उमेदवारी अर्ज दाखल केले. यात अनेक मंत्री, आमदार आणि दिग्गज नेत्यांचा समावेश होता. बहुतांश

उमेदवारांनी शक्तिप्रदर्शन करत, जाहीर सभा घेत तर कुणी कसलाही गाजावाजा न करता साधेपणानं उमेदवारी अर्ज दाखल केले. मनसे, शेकाप आणि वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांनीही काल अर्ज दाखल केले. विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याच्या कालच्या तिसऱ्या दिवस अखेर राज्यात 552 उमेदवारांनी 720 उमेदवारी अर्ज दाखल केल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. दरम्यान नांदेड लोकसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीसाठी काल काँग्रेसचे रविंद्र चव्हाण यांच्यासह अन्य एका इच्छुकाचा अर्ज दाखल झाला. या लोकसभा मतदारसंघात आतापर्यंत तीन उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

**झारखंड-निवडणूक**

झारखंडमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची आज शेवटची तारीख आहे. या टप्प्यात 13 नोव्हेंबरला, 43 मतदारसंघांत मतदान होणार असून, आतापर्यंत 748 उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. दरम्यान, झारखंडच्या आगामी विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने आणखी सात नावांची घोषणा केली आहे. के. एन.  त्रिपाठी डाल्टनगंजमधून तर निशात आलम पाकौरमधून लढणार आहेत.

**केरळ-पोटनिवडणूक**

केरळमध्ये वायनाड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या उमेदवार नव्या हरिदास यांनी काल आपला उमेदवारी अर्ज सादर केला. त्याआधी प्रियंका गांधी यांनी कॉंग्रेसकडून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. वायनाडमध्ये लोकसभेसाठी येत्या  13 तारखेला  पोटनिवडणूक होत आहे.

**तर्कीहल्ला**

इराक आणि उत्तर सीरियामध्ये, टर्की लष्कराने केलेल्या कारवाईत  47 दहशतवादी ठिकाणांवर हल्ले करण्यात आले, यात, अनेक दहशतवादी ठार झाले, अशी माहिती टर्कीचे संरक्षण मंत्री यासर गुलेर यांनी दिली आहे. इराकमधील 29 आणि उत्तर सीरियातील 18 लक्ष्यांवर हल्ले करण्यात आले. टर्कीतील, अंकारा येथे झालेल्या प्राणघातक दहशतवादी हल्ल्याचा बदला म्हणून ही कारवाई करण्यात आल्याचं गुलेर यांनी सांगितलं.

**विशेष रेल्वेगाड्या**

दिवाळी, छटपूजा अशा सणासुदीच्या काळात प्रवाशांची होणारी गर्दी लक्षात घेऊन रेल्वे मंत्रालयाने सात  हजार विशेष रेल्वेगाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. या विशेष रेल्वे गाड्यां मधून दररोज  सुमारे दोन लाख प्रवासी प्रवास करू शकतील अशी माहिती केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत दिली.

**दाना-चक्रीवादळ**

बंगालच्या उपसागरात तयार झालेलं दाना चक्रीवादळ काल मध्यरात्री ओडिशाच्या भितरकनिका नॅशनल पार्क आणि धामरा बंदर या उत्तर किनारपट्टीरील भागात  धडकलं. चक्रीवादळच्या प्रभावामुळे या भागात ताशी 120 किलोमीटर वेगाने वारे वाहत होते. केंद्रापारा, मयूरभंज, कटक, जाजपूर, बालासोर आणि जगतसिंगपूर जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस सुरू असून, आपत्ति निवारण दलाला सतर्क राहण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत.
दरम्यान, हे वादळ  आज उत्तर ओडिशा आणि पश्चिम बंगाल किनारपट्टी ओलांडेल असा अंदाज भारतीय हवामान विभागाचे  महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी वर्तवला आहे.

**क्रिकेट**
भारत आणि न्यूझीलंड यांच्यातला दुसरा कसोटी क्रिकेट सामना कालपासून पुण्यात सुरू झाला. पहिल्याच दिवशी भारताच्या दोन फिरकीपटूंनी न्यूझीलंडचा डाव 259 धावांत गुंडाळला. न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला; मात्र रविचंद्रन अश्विन आणि वॉशिंग्टन सुंदर यांच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर न्यूझीलंडचा पूर्ण संघ 259 धावा करून तंबूत परतला. वॉशिंग्टन सुंदरनं सात तर रविचंद्रन अश्विननं तीन गडी बाद केले. कालच्या दिवसाच्या खेळ संपला तेव्हा भारताच्या 1 गडी बाद 16 धावा झाल्या होत्या. शुभमन गिल 10 तर यशस्वी जैस्वाल 6 धावांवर खेळत आहेत.

**महिला क्रिकेट**
भारत आणि न्यूझीलंडच्या महिला क्रिकेट संघांमध्ये झालेला मर्यादित षटकांचा सामना काल भारतानं 59 धावांनी जिंकला. आणि तीन सामन्यांच्या या मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली. अहमदाबादमध्ये झालेल्या कालच्या सामन्यात भारतानं पाहुण्या संघाला 228 धावांचं लक्ष्य दिलं होतं. मात्र न्यूझीलंडचा संपूर्ण संघ 41व्या षटकापर्यंत केवळ 168 धावाच करू शकला.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**